**मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे कक्ष**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-५९० /२०२२ दिनांक :- २७/०६/२०२२.

# बनावट लिंक पाठवुन फसवणुक केलेली १,३०,०००/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड परीसरात राहणारे भुपेंद्र बकिमचंद्र त्रिवेदी यांना अनोळखी व्यक्तीने फोन करुन तुमचे विजेचे बिल भरणे बाकी आहे ते न भरल्यास विजपुरवठा खंडीत होईल. सदर विजपुरवठा चालु ठेवण्याकरीता तक्रारदार यांचे मोबाईलवर लिंक पाठवुन ती त्यांना क्लिक करण्यास सांगितले. तक्रारदार यांनी सदर लिंक वर क्लिक करताच त्यांचे खात्यातुन १,३०,०००/- रु कपात झाल्याबाबत त्यांना मॅसेज प्राप्त झाला. अश्याप्रकारे त्यांची फसवणुक झाल्याने तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे आवक क्रमांक ८८८/२०२२ दिनांक २४/०६/२०२२ रोजी चौकशीकामी प्राप्त करण्यात आला होता.

नमुद तक्रारीबाबत सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ दखल घेवुन तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम RchargeCube या वर गेल्याचे दिसुन आल्याने तात्काळ सदर कंपनीसोबत पत्रव्यवहार करण्यात आला. उपरोक्त पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने तक्रारदार यांची १,३०,०००/- रक्कम त्यांचे खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

- अश्या प्रकारे फसवे कॉल अथवा एसएसएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ई मेल, कॉल्स, यांची विश्वासहर्ताची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा OTP किंवा वैयक्तीक माहिती देवु नये.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अश्या या प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणुक झाल्यास अथवा असे कृत्य कोणी इसम करीत असल्यास आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईन संपर्क साधुन तक्रारी द्यावी.

सदरची कामगिरी मा.श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजिकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/ माधुरी धिंडे, यांनी केली असुन यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे कक्ष संपर्क क्रमांक :- ०२२-२८११-०१३५
सायबर गुन्हे कक्ष व्हॉटसअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

- सायबर गुन्हे कक्ष ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**